Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2018

SPECIAL ISSUE-XL

# भारतीय साहित्यावर जागतिकीकरणाचा परिणाम

# भारतीय साहित्यपर भूमंडलीकरण का परिणाम

# Effects of Globalization on Indian Literature

**अतिथी संपादक :**

प्राचार्य डॉ. अरुण डी. येवले

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

रावळगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक

**विशेषांक कार्यकारी संपादक :**

उपप्राचार्य गौतम एस. निकम

प्रा. शरद टी. आंबेकर

प्रा. नारायण एल. सोनवणे

प्रा. स्वप्नील पी. गरुड

प्रा. जितेंद्र व्ही. मिसर

**मुख्य संपादक :**

डॉ. धनराज धनगर

This journal is indexed in :

- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
February 2018

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2018

SPECIAL ISSUE-XL

## भारतीय साहित्यावर जागतिकीकरणाचा परिणाम
## भारतीय साहित्यपर भूमंडलीकरण का परिणाम
## Effects of Globalization on Indian Lietarature

अतिथी संपादक
डॉ. अरुण डी. येवले
प्राचार्य
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रावळगांव

विशेषांक कार्यकारी संपादक
उपप्राचार्य गौतम एस. निकम
प्रा. शरद टी. आंबेकर
प्रा. नारायण एल. सोनवणे
प्रा. स्वप्नील पी. गरुड
प्रा. जितेंद्र व्ही. मिसर

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 500/-



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 40 : Globalization
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **मराठी विभाग** | | |
| | **भारतीय साहित्यावर जागतिकीकरणाचा परिणाम** | | |
| 1 | उच्च शिक्षणात मराठी साहित्याची भूमिका | - प्राचार्य अरुण येवले | 05 |
| 2 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | - डॉ. वाल्मिक आढावे | 08 |
| 3 | मराठी कवितेतील स्त्री चित्रणावर जागतिकीकरणाचा प्रभाव | - डॉ शिवाजी परळे | 14 |
| 4 | जागतिकीकरणात भटक्यांच्या सांकेतिक बोली आणि लोकसाहित्य | -प्रा. रेणुकादास उबाळे | 20 |
| 5 | मराठीसाहित्य, संस्कृती व भाषेवरील जागतिकीकरणाचा परिणाम | - डॉ. किरण गंगापूरकर | 25 |
| 6 | जागतिकीकरणात मराठी कवितेतील बदलते सामाजिक वास्तव | - प्रा. शरद आंबेकर | 30 |
| 7 | गोरबंजारा बोली : संदर्भांकन | - प्रा. संतोष जाधव | 35 |
| 8 | जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न | - प्रा. स्वप्निल गरुड | 41 |
| 9 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | - प्रा. सुनील राठोड | 45 |
| 10 | जागतिकीकरण : समाज व साहित्य | - प्रा. मिलिंदकुमार देवरे | 52 |
| 11 | आदिवासी साहित्याचा दृष्टीकोन : एक अभ्यास | - प्राचार्य डॉ. फारूक शेख | 56 |
| 12 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | - प्रा. ओ. आय. वसावे व प्रा.विष्णू बोरसे | 59 |
| 13 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | - प्रा. अवंतिका उत्तम पगार | 62 |
| 14 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | - कुंडलिक पारधी | 66 |
| 15 | जागतिकीकरणाच्या संदर्भात नव्वदोत्तर मराठी व हिंदी निवडक कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास | - प्रा. सुधीर मोरे | 71 |
| 16 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | - प्रा. ए. जी. नेरकर | 80 |
| 17 | स्त्रीवादी आत्मचरित्रातून स्त्रियांनी घेतलेला 'स्व' चा शोध | - प्रा. मंगला पाटील | 84 |
| 18 | जागतिकीकरणाचा भारतीय साहित्यावर होणारा परिणाम | - कु. अश्विनी निकम | 88 |
| 19 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | - वैशाली ताठे | 92 |
| 20 | जागतिकीकरणानंतरच्या बदलांचा शोध घेणारी अशोक कोतवाल यांची कविता | - तुषार ज्ञानेश्वर पाटील | 99 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | - प्रा. संगीता अहिरे | 106 |
| 22 | जागतिकीकरण आणि आदिवासी लोकपरंपरा | - प्रा. सुलतान पवार | 108 |
| 23 | जागतिकीकरणाचा भारतीय जीवनावरील प्रभाव | - डॉ. गोविंद रामदिनेवार | 115 |
| 24 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | - प्रा. राजरत्न दवणे | 119 |
| | **हिंदी विभाग** | | |
| | **भारतीय साहित्यपर भूमंडलीकरण का परिणाम** | | |
| 25 | जिंदगी कि वास्तवता कि दास्तान 'दौड' | - डॉ. अनिता नेरे | 123 |
| 26 | वैश्विकरण के युग में अपनी नई पहचान बनती 'हिंदी' | - अनिता राजबंशी, डॉ. अनिता नेरे | 127 |
| 27 | हिंदी की महिला उपन्यासकारों के उपन्यासों में भूमंडलीकरण का प्रभाव | - गौतम निकम | 129 |
| 28 | भूमंडलीकरण और लोकसाहित्य | - निलम पवार | 132 |
| 29 | वैश्विकरण और हिंदी | - डॉ. यु. पी. शिरोडे | 137 |
| 30 | भूमंडलीकरण कि आग मे आम होती नारी : कविता के संदर्भ में | - डॉ. पंढरीनाथ पाटील | 140 |




Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 40 : Globalization
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# जागतिकीकरण आणि मराठी भाषा

**प्रा. ए. जी. नेरकर**
मराठी विभाग प्रमुख,
म. स. गा. महाविद्यालय,
मालेगांव कॅम्प, मालेगांव, नाशिक

भाषा कोणतीही असली तरी ती ज्ञानाची गंगोत्री असते. जे आपल्याजवळ नाही म्हणजे आपल्या भाषेत नाही ते इतर भाषेतून मिळवावे लागते. समजा आपण इतर भाषेच्या आहारी जावून अरपल्याच भाषेला दुय्यम स्थान देत असाल तर आपली भाषा मारण्यास, तिचा ऱ्हास करण्यास आपणच कारणीभूत आहात. इंग्रजी राजवटीत चिपळूणकरांनी मराठीस 'वाघिणीचे दूध' म्हटले आहे. याचे अनुकरण म्हणजे सर्व ब्राम्हण वर्ग इंग्रजीकडे वळला आणि जे जे इंग्रजीत चांगले ते ते मराठीत आणू लागला. यातून अनेक वाङ्मय प्रकारांचे आणि ज्ञानशाखांचे मराठीकरण सुरु झाले.

मराठी भाषा जगवायची असेल तर मराठी भाषा विषय घेवून पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हायला हव्यात व अशा संधी कोणकोणत्या क्षेत्रात आहेत याविषयी ग्रंथात करण्यात आलेली चर्चा विद्यार्थ्यांना मार्गदर्शक अशीच आहे, संधी असतात पण त्या कोणत्या क्षेत्रात आहे हे बहूजन विद्यार्थ्यांना नेमके माहित नसते. त्याला मार्गदर्शनाची जोड मिळाली तर तो तिचे सोने करेल. तो जे शिक्षण घेतो त्यातून त्याला नेमके कोणते रोजगार मिळणार हे त्याला जर कळले तर तो त्या क्षेत्रात विशेष प्राविण्य कसे मिळविता येईल याचा प्रयत्न करील. या जागतिकीकरणाच्या युगात आपल्याकडे रोजगाराभिमुख शिक्षण पध्दती निट रुजलेली नाही. मराठीला दूषित करणारे घटक सातत्याने अंगावर येत असल्याने मराठी भाषेच्या जोरावर रोजच रोजगार मिळविणारे उद्या मराठी वाचवतील याची खात्री कुणी ठामपणे देऊ शकणार नाही. मराठी भाषा आजवर टिकली आहे. ती सर्वसामान्यांच्या भाषा प्रेमामुळे. आजही निरक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. भाषा वाचण्यासाठी त्याला साक्षर करुन वाचनाच्या कक्षेत आणणे गरजेचे आहे. त्यासाठी त्याला गावपातळीवर वाचनालय असणे गरजेचे आहे. बाजारात नेमके काय चांगले आहे हे त्याच्या पर्यंत पोहचवण्याची जबाबदारी नियतकालीकांची आहे. ही जबाबदारी आता ते विसरु लागली आहेत. डॉ.मनमोहनसिंग म्हणतात त्याचप्रमाणे जर जार्गतिकीकरणाला मानवी चेहरा मिळाला आणि प्रत्येक माणसालाच जर विकासाची संधी मिळाली तर त्याला विरोध करण्याचे कारणच शिल्लक राहणार नाही."

**जागतिकीकरणाच्या काही तज्ज्ञांनी व्याख्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे-**

१) अर्थतज्ज्ञ सी.प. खेर यांच्या मते, "जागतिकीकरण म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सीमाचे विश्लेषण, मोकळेपण, आजवर उभ्या केलेल्या अडथळयांचे विसर्जन होय."

२) अर्थतज्ज / यु.जी.सी. चे अध्यक्ष डी.सुखदेव थोरातांच्या मते- तंत्रज्ञानातील प्रगती आणि मानवी जीवनात होणारे नवीन-नवीन बदल त्यांच्या परिणामांच्या गाभ्यातून प्रगत होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या, सर्व देशांच्या आणि शासनाच्या तसेच सर्व बाजारपेठांच्या जागतिक एकत्रीकरणाच्या प्रक्रियेला जागतिकीकरण असे म्हणतात.

जार्गतिकीकरण समजून घेत असतांना पारंपरिक समस्यांमुळे झालेल्या अवनतीला जागतिकीकरणाचे परिणाम म्हणून अधोरेखित केले जाण्याचा धोका आहे. त्याचे आकलन नीट व्हावे ऐवढी माफक अपेक्षा आहे. म्हणून जागतिकीकरणाच्या अनुषंगाने मराठी भाषेचा अभ्यासक्रम कसा असावा याचा विचार होणे काळाची गरज आहे.

मराठी भाषेमध्ये सतत नवनिर्मिती होणे आवश्यक आहे. आपापल्या क्षेत्रातील यशस्वी माणसांनी आपलं संशोधन, आपले विचार मराठी भाषेत मांडणं आवश्यक आहे. या संदर्भात पु.ल.देशपांडे यांनी आपल्या भाषणात म्हटलं



Scanned by CamScanner

आहे. त्यापेक्षा कठीण असं काय आहे जे मराठीत मांडता येणार नाही ? नवनवीन उदयीत झालेल्या शास्त्रातील अनेक नवीन पुस्तकांचे मराठीत भाषांतर केले पाहिजे. नुसती शास्त्रे नव्हे तर नवीन प्रकारची साहित्य निर्मिती ही मराठीत होणे आवश्यक आहे. साहित्यात काळानुसार बदल होणं आवश्यक आहे. बदललेल्या अभिरुचीनुसार नवीन पिढीला आवडेल अशा कविता, कथा किंवा असे विषय साहित्यातून हाताळणं आवश्यक आहे. अशा प्रकारचे तयार झालेले सर्व साहित्य नवीन माध्यमांतून इंटरनेट आणि दृकश्राव्य माध्यमांतून लोकांपुढे आणले पाहिजे.

जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगाला सामोरे जाण्यासाठी मराठी प्रकाशक, साहित्यिक आणि सरकारने नवीन माध्यमांना आपलेसे करणे आवश्यक आहे. नवीन पिढीपुढे जर मराठी साहित्य नवीन माध्यमातुन सहज उपलब्ध झाले तरच काळाचे हे आव्हान आपण समर्थनपणे पेलू शकू.

**मराठी भाषेने जागतिकीकरण पचवावे :**

मानवी जीवनमान जस बदलत जाते. त्या अनुषंगाने भाषेतही बदल जातात. नविन जीवना बरोबर नविन आव्हानेही भाषेने स्वीकारली आहेत. वेगवेगळया भाषा एकमेकांच्या बघीणी असतात. उदा. मराठीने अनेक शब्द फारशी, उर्दू, कडून स्वीकारले आहेत. आणि ती शब्द कायमस्वरुपी अंगीकारुन पचवली देखील आहेत. यामुळे मराठी भाषा मृत झाली असं नाही तर ती अधिक समृध्द झाली. बोली व इतर भाषेमुळेच कोणतीही भाषा अधिक वाढत जाते. भाषा हया एकमेकांना घेवून चालतात. उदा. कानडी- आक्का, अडकित्ता, तामिळ-नीर, गुजराती-नूतन अशा प्रकारची शब्द मराठीने अगदी आनंदाने स्वीकारली. दोन भाषेतील संवाद आणि साहित्यही सर्वमान्य व कसदारपणे निर्माण झाले. उदा. गझल, उर्दू व मराठी -

"हे अंधेरी रात फिरभी रोशनिकी बात कर,
पेटविण्या दीप तू काळजाची बात कर"

यामध्ये आपण त्या भाषेतील ज्ञान, भावना पचविल्या आहेत. तसेच मराठीत "तुझ्याविषयी माझ्या मनात काहीतरी होतय." हेच वाक्य हिंदीत- "मेरे दिल में कुछ, कुछ होता है |" हे वाक्य मुळ भाव व्यक्त करते. भावासाठी म्हणून आपण एक भाषिक आंदोलने मान्य करुन पचवू शकतो. मराठीत पचविण्याची क्षमता आहे. जागतिकीकरणात मराठी भाषा संपूर्णपणे विलीन होवून किंवा मराठीतून जागतिकीकरणातील पारिभाषीक शब्द निर्माण व्हावेत. जागतिकीकरणाने मानवी जीवनावर, जगण्यावर परिणाम केला आहे. मराठी भाषा हे सगळे जागतिकीकरण पचवेल व मराठी भाषा कधीच मरणार नाही.

जागतिकीकरणाचे लोण हे शहरी भागांपासून ते ग्रामीण भागातील समाजाच्या सर्व स्तरापर्यंत जाऊन पोहचले आहे ते थांबवले तरी थांबणारे नाही. मराठी भाषा ही जागतिकीकरणात सुध्दा ठामपणे उभी राहिली आहे. मराठी भाषेत बरेचशे इंग्रजी शब्द रुढ झाले आहेत व ते मराठीने सुध्दा भाषा समृध्दीचा एक भाग म्हणून स्वीकारले आहेत.

उदा. "नाच रे मोरा आंब्याच्या वनात" ऐवजी "ट्विंकल ट्विंकल लिटल स्टार" किंवा जॉनी जॉनी एस पपा, यासारख्या इंग्रजी कविता पाश्चात्यांचे अनुकरण करण्यासाठी आल्या.

मराठी भाषा टिकविण्यासाठी शाळा, महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांच्या दैनंदिन नजरेस पडतील अशा ठिकाणी मराठी नियतकालिके, वृत्तपत्रे, मासिक, साप्ताहिके, वेगवेगळी पुस्तके ठेवली पाहिजेत. जेणेकरुन ते वाचण्याचा त्यांना मोह होईल व भाषा विषयाची ओढ वाढेल. इंटरनेटच्या माध्यमातून सुध्दा शाळा, महाविद्याल्यांनी काही चांगल्या कथा, कादंबऱ्या, मराठी नाटके व चित्रपटे यांचा संग्रह करुन ते विद्यार्थ्यांना वाचायला व पहायला लावले पाहिजे.

उदा. साने गुरुजींची श्यामची आई, कांदबरी व चित्रपट. जागतिकीकरणात मराठी भाषा टिकवण्यासाठी शासनाने साहित्य, संस्था, चित्रपटे, नाटके व ज्या काही सांस्कृतिक अस्मिता आहेत त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे तरच जागतिकीकरणाच्या प्रवाहात मराठी भाषा आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकते.



Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
February 2018

**जागतिकीकरणाचे परिणाम :**

'अमृतातेंही पैजा जिंके' अशी मराठी भाषेचे गोडवे सांगणारी आपली मराठी भाषा आज जागतिकीकरणाच्या स्पर्धेत आपले अस्तित्व टिकविण्याच्या मोहात आणि पैशाच्या लोभापायी मराठी भाषिक मराठीला विसरल चालले आहेत. पारतंत्र्याच्या काळात आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण मराठी आणि इंग्रजी या दोन भाषा प्रत्यक्षात स्वीकारल्या. हिंदी ही राष्ट्रभाषा तर सोबत होतीच. इंग्रजी भाषा स्वीकारली परंतु आपलं स्वत्व आपण सोडल नाही. पण जर आपली मुलं, नातवंड ही कोणत्या भाषेत शिक्षण घेत आहेत याचा जर मागोवा घेतला तर असे निदर्शनास येते की, ही सर्व इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेत आहेत. मराठी वापर फक्त घरात बोलण्यासाठी करतात. बाहेरच्या जगात ते हिंदी किंवा इंग्रजी सहाय्याने देवाण-घेवाण करतात. एवढंच काय तर घरात देखील बोलण्यात इंग्रजी शब्द येवून जातात. विशेष म्हणजे इंग्रजीला आपले ज्ञान वाढावे म्हणून जवळ करत नाही तर बऱ्यापैकी नोकरी मिळविण्याच्या होवून इंग्रजी वापर करतो.

बरीच मुलं परदेशात जावून शिक्षण घेतात व आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करतात. परंतु मराठी साहित्य वाचत नाही. याचा अर्थ असा नाही की ते इंग्रजी वाचन खूप करतात. याला काही प्रमाणात पालक ही जबाबदार आहे. कारण जर आपल्या घरात एखादी छोटी लायब्ररी बनवून त्यात मराठी साहित्याची पुस्तके ठेवली तर मुलांना मराठी वाचनाची आवड निर्माण होईल. आर्थिक स्थिती चांगली असूनही आपल्या मुलांना मराठी पुस्तके विकत घेवून देवू शकत नाही.

आज ही आपण आपली मानसिकता बदलत नाही. घरात आपली भाषा मराठी असते तरी देखील मुलांशी बोलतात, इंग्रजीतून बोलतात तर का ? पुढे त्यांना अडचण येवू नये म्हणून, घरात फर्निचर आणि सुशोभिकरणाच्या अनेक वस्तू घेतील पण तेवढया प्रमाणात मराठी भाषेची पुस्तके घेवून देत नाही. आजही ग्रामीण भागातील मुलांच्या मनातील न्यूनगंड जात नाही. ते शहरी भागातील मुलं ही खूप वेगळी असतात. त्यांना इंग्रजी खूप येतं या भ्रमात राहून त्यांच्यापासून अलिप्त राहतात. आपली मुलं मागे राहू नये. ग्रामीण शेतकरीही आपल्या मुलांना इंग्रजी यावं या हट्टाहासापायी त्याला शहरात घर करतो. म्हणजे या जागतिकीकरणामुळे असं वाटायला लागलं की आपली मराठी भाषा संपते की काय ?

**उपाययोजना :**

मराठी भाषेचा उत्तम अभ्यास करावा. याचा अर्थ इंग्रजी भाषा शिकू नये असा नाही. मराठीचा अभिमान बाळगावा आणि मग इंग्रजी भाषा शिकावी. मराठी भाषेला जागतिक दर्जा मिळावा म्हणून आज अखिल मराठी विश्व साहित्य संमेलने इतर देशातही घेतली जात आहेत. परंतु अशाने मराठी टिकेल असे नाही. याकरिता अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने, कामगार साहित्य संमेलने, बालसाहित्य संमेलने स्त्री लेखकांचे संमलने होत आहेत. यातून मराठी भाषेला जागतिक स्तरावर घेवून जाण्याची मनोकामना व्यक्त करतात. आज जागतिकीकरणाच्या दडपणाखाली कॉम्प्युटरच्या, इंटरनेटच्या माध्यमामुळे जग अतिशय जवळ आले आहे. तसा मराठीचा हा वापर काही प्रमाणात केला जात आहे. परंतु मराठीच्या व्याकरणांच्या नियमानुसार काना, विलांटी, मात्रा इ. गोष्टीमुळे मराठी कठिण वाटते. त्यामुळे मराठीचा वापर करण्याऐवजी इंग्रजी टायपिंगचा वापर जास्त करतात.

**जागतिक स्तरावर नेण्यासाठी मराठी भाषेचे प्रयत्न :**

मराठी भाषेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी मराठी भाषिकांनी खालील गोष्टींचा विचार करुन प्रयत्न करावेत. यासाठी विज्ञानाचा आधार घेणे गरजेचे आहे.

१) आज जगात साहित्य अभ्यास करण्याच्या संख्येपेक्षा विज्ञानाचा अभ्यास करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. म्हणून विज्ञान लेखन जर मराठीतून झाले तर ते तसे शिकविले तरच मराठी भाषेला टिकवता येईल.

२) कॉम्प्युटरची भाषा मराठी असावी.



Scanned by CamScanner

३) आपल्या भाषेविषयीचा न्यूनगंड बाळगता कामा नये.

४) मराठी भाषेचा अभिमान बाळगला पाहिजे.

५) मराठी भाषा नोकरी मिळविण्याचे माध्यम बनली पाहिजे.

६) कुटूंबात मराठी भाषेचाच वापर केला गेला पाहिजे.

७) आपणच आपल्या भाषेला कमी लेखू नये.

८) मराठी साहित्य देखील इतर भाषांमध्ये भाषांतरित झाली पाहिजेत.सर्व गोष्टी तेव्हाच खऱ्या ठरतील. जेव्हा मराठी माणूस संशोधन मराठी भाषेत करेल.

९) व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम आपल्या भाषेतून कसे शिकवता येतील याचे आपल्या अभ्यास मंडळांनी पुनर्लेखन करायला पाहिजे.

१०) परंपरागत अभ्यासक्रमात बदल करुन नविन, विज्ञान तंत्रयुगाला अनुसरुन आधुनिक अभ्यास तयार केला पाहिजे. त्यामुळे सर्वांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

११) शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमाप्रमाणे मराठी माध्यमाचा स्वीकार केला पाहिजे. मराठी माध्यमांच्या शाळांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजे. दर्जेदार शिक्षण मराठी माध्यमातून उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

**समारोप :**

मराठीला खऱ्या अर्थाने समृध्द, संपन्न बनवायचे असेल तर ती केवळ साहित्य, वाङ्मयीन भाषा न राहता आर्थिक, ऐतिहासिक, सांसारिक समृध्दी साधण्यास साहाय्यक ठरणारी भाषा झाली पाहिजे. मराठी भाषेचा संवाद भाषा, शिक्षण भाषा ज्ञानभाषा, माहितीभाषा अशा विविध दृष्टिकोनातून विकास झाला पाहिजे.

**संदर्भ :**

१) जागतिकीकरण आणि मराठीभाषा : लेखक- डॉ.सौ.सूर्यकांता अजमेरा, प्रा.विनोद उपर्वट



Scanned by CamScanner